IMPACT FACTOR
5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Journal*
ISSN
2455-4375

# मानवाधिकार आणि भारतीय संविधान

**प्रा. सुरेश जे. भालेराव ( राज्यशास्त्र विभागप्रमुख)**
श्री गजानन महाराज महाविद्यालय, मुकुटबन ता.
झरी जामनी जि.यवतमाळ
मो. नं.- 8605217588
ई-मेल - sureshbhalerao080@gmail.com

---

**प्रस्तावना :**

जगातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी काही अधिकाराची आवश्यकता असते. हे सत्य जगातील सर्वच जानकारांनी प्राचीन काळापासून ओळखले आहे. प्राचीन अधिसत्तावादी समाजामध्ये व्यक्तीच्या अधिकाराची संकल्पना अमान्य असली तरी आधुनिक लोकशाही समाजाने मात्र तिचा आदर्श म्हणून अंगीकार केलेला आढळतो. म्हणून आधुनिक युग हे मानवी अधिकाराचे युग म्हणून ओळखले जाते. मानवी अधिकाराची संकल्पना ही मानवी जीवन व मानवी सन्मानाशी निगडित आहे. विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक महत्त्वाचे घटित म्हणून मानवी अधिकार संकल्पनेचा उदय झालेला दिसून येतो. दुसऱ्या महायुद्धपर्यंत राज्य प्रणित अधिकारांची संकल्पनाच रूढ होती. मानवाधिकाराच्या राज्यपद्धती संकल्पनेत राज्यसंस्थेद्वारा मान्य केले जाणारे व राज्यसंस्थेच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध असणारे व्यक्तीचे दावे म्हणजे मानवाधिकार अशी धारणा होती. तथापि दुसऱ्या महायुद्धानंतर उदयाला आलेल्या मानवी अधिकार संकल्पनेने राष्ट्र राज्याच्या सीमा ओलांडून अधिकार विषयक चर्चा विश्वाला वेगळे परिणाम दिले. म्हणजे आता राज्याची मान्यता असो वा नसो व्यक्तीला जन्मता काही अधिकार प्राप्त होतात ही संकल्पना आधी मान्य झालेली आहे. थोडक्यात व्यक्ती ही मानव प्राणी असल्यामुळे तिला सभावताच काही अधिकार प्राप्त होतात आणि ती एखाद्या देशाचा नागरिक असो नसो तिला आपल्या मानवी अधिकाराच्या रक्षणाचा दावा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर करता येतो. आज राष्ट्र राज्याच्या कार्यक्षेत्रातील मानवी अधिकाराबरोबर आपण कोणत्याही राज्य विस्थापित व निर्वासितांच्या अधिकारांची चर्चा करू शकतो. म्हणूनच मानवी अधिकारांचे उल्लंघन हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक कडीचा मुद्दा बनला आहे. एखाद्या राष्ट्रात मानवी अधिकारांचे उल्लंघन होत असल्यास राष्ट्रीयतेचे नवे तर आंतरराष्ट्रीय टीकेला सामोरे जावे लागते. प्रसंगी आंतरराष्ट्रीय संघटना त्या प्रदेशात हस्तक्षेपचेही पाऊल उचलू शकतो.

**मानवी अधिकाराची संकल्पना :**

मानवी अधिकाराची संकल्पना समजून घेण्यासाठी सर्वप्रथम अधिकार म्हणजे काय हे स्पष्ट करणे आवश्यक ठरते. प्रा. लासकीच्या मते अधिकार म्हणजे समाज जीवनाच्या अशा अटी आहेत की ज्या शिवाय

व्यक्ती आपला सर्वांगीण विकास करू शकत नाही. अधिकाराशिवाय म्हणजे पोषक वातावरणाशिवाय व्यक्तीच्या विकासाची कल्पनाच करता येत नाही. थोडक्यात अधिकार म्हणजे व्यक्तीने राज्याकडे केलेले असे दावे असतात ज्याद्वारे व्यक्ती स्वतःसाठी मुक्त अवकाश निर्माण करून स्वतःची क्षमता व अंतरिक्षी शक्तीचा विकास करू शकतो. त्यासाठी राज्याला एका बाजूला व्यक्ती विकासावर गदा येऊ नये यासाठी काही गोष्टी करण्यापासून स्वतःवर नियंत्रण ठेवावे लागते. तर दुसऱ्या बाजूला व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करता यावा यासाठी सहाय्यभूत ठरतील अशा काही बाबींची तरतूद करावी लागते. उदाहरणार्थ व्यक्तीला आपले विचार मुक्तपणे अभिव्यक्त करता यावेत यासाठी विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य द्यावे लागते किंवा शिक्षणासारखा अधिकार स्वातंत्र द्यावे लागते किंवा शिक्षणासारखा अधिकार राज्याने काही सक्रिय व सकारात्मक पावले उचलावी याचा निर्देश देतो. थोडक्यात व्यक्तीला कोणत्याही अडथळया विना स्वतःचा विकास साध्य करता यावा यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे म्हणजे अधिकार होय. प्रस्तुत अधिकाराची हमी देणे ही राज्यसंस्थेची प्राथमिक जबाबदारी बनते. व्यक्तीच्या अधिकारांच संरक्षण व संवर्धन संदर्भात राज्याची भूमिका महत्त्वाची ठरते. याचाच अर्थ राज्याच्या हमीशिवाय व्यक्तीला स्वतःचा अधिकाराचा उपयोग घेणे अशक्य बनते. अशारीतीने अधिकार संकल्पनेत अधिकाराची संकल्पना राज्य कार्यक्षेत्रापूर्ती सिमित बनली. तथापि मानवी अधिकराची संकल्पना राज्याच्या सीमेपलीकडून जाऊन वैश्विक अधिकाराची संकल्पना बनली.

व्यक्ती हा मनुष्यप्राणी असल्यामुळे ज्याच्या अधिकारांवर दावेदार ठरते त्यास मानवी अधिकार संबोधले जाते. मानवी अधिकार संकल्पनेचे असे गृहीतक आहे की सर्व मनुष्य हे समान आहेत म्हणून त्यांना प्रतिष्ठा पूर्वक जीवन जगण्यासाठी काही समान अधिकार उपलब्ध असले पाहिजे. अशाप्रकारे मानवी अधिकार एखाद्या राज्यातील विशिष्ट प्रकारच्या राजकीय व कायदेशीर चौकटीवर अवलंबून नसून त्याचे स्वरूप वैश्विक आहेत. त्यांचे स्वरूप अधिक व्यापक आहे. मानवी सभावतच त्याचा उगम सापडते. म्हणूनच जात, वंश, भाषा,वंशकता, धर्म, संस्कृती आणि राष्ट्रीयतद्वारे व्यक्ति व्यक्तिंमध्ये भेदभाव न करता व्यक्तीला आपल्या जीवित स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी काही अधिकार उपलब्ध असले पाहिजे.

जन्मताच सर्व माणसे समान आहेत. म्हणजेच ज्यांच्या सद्विवेकाची क्षमता आहे आणि जगातील सर्व मनुष्यांना काही समान मूलभूत गरजा असतात. ज्या प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठा पूर्वक व सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी पूर्ण कराव्या लागतात या दोन पायाभूत गृहीतकांवर मानवी अधिकाराची संकल्पना उभी आहे. प्रत्येक व्यक्ती चांगले काय वाईट काय याचा आपापल्या क्षमतेनुसार निर्णय घेऊ शकते. सर्व मानवांमध्ये ही वैचारिक शक्ती आढळून येते. म्हणून सर्व मानव समान आहेत अशी धरणा मांडण्यात आली. दुसऱ्या बाजूला सर्व मानवांना काही समान मूलभूत गरजा असतात अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक भौतिक गरजा स्वतःच्या अस्तित्वाची व प्रतिष्ठा पूर्वक जीवनाची हमी देण्यासाठी स्वावलंबी व स्वयंसेवी असण्याची आर्थिक गरज सभावता मानव हा सामाजिक प्राणी असल्याने निर्माण होणारी समूहाची गरज शेवटी आत्मविकास,सर्वांगीण

विकास व आपले अंतिम ध्येय साध्य करण्याची मानसिक गरज या सर्वांच्या समाईक गरजा असतात. अधिकार विशेषतः मानवी अधिकार या सार्वत्रिक मूलभूत मानवी गरजांची परिपूर्ती करण्यासाठी अत्यावश्यक ठरतात. या मूलभूत अधिकारांची पूर्तता करण्यासाठी काही अधिकाऱ्यांची हमी देणे गरजेचे ठरते अशारीतीने अधिकार मानवाच्या सार्वत्रिक मूलभूत गरजातून उगम पावतात आणि वैश्विक मानवी अधिकाराचे रूप धारण करतात. मानवी अधिकाऱ्यांची संकल्पना मानवी मात्रातील मूलभूत समतेच्या गृहीतकावर आधारित आहे. यामागे अशी धारणा आहे की, मानव हा जन्मतः मुक्त आहे म्हणून त्यांना कोणत्याही भेदाभाव रहित समान वर्तणुकीचे हमी दिली पाहिजे. त्यामुळे समान वागणूक आणि भेदभावाचा अभाव या मानवी अधिकाराच्या विचारातील दोन मूलभूत संकल्पना आहे.

**मानवाधिकार आणि भारतीय संविधान :**

भारताचे संविधान हे लिखित स्वरूपाचे असून अमेरिका आणि आयर्लंड या देशानंतर लिखित स्वरूपाची राज्यघटना स्वीकारणारे भारत हे तिसरे राष्ट्र ठरले होते. भारताच्या संविधानाने व्यक्तीच्या मूलभूत अधिकारचा स्वतंत्र भाग आपल्या संविधानात अंतर्भूत केला आहे. वास्तविक पाहता भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातच मानवी अधिकाराशी आदर्श असलेल्या स्वातंत्र्य,समता,न्याय आणि बंधुता या तत्त्वाप्रती निसंदीग्ध स्वरूपात बांधिलकी व्यक्त करण्यात आली आहे. भारतीय संविधानाच्या सरनम्यातील उद्दिष्टांना दृश्य स्वरूप देण्यासाठी भारतीय राज्यघटनेने दोन भागात मानवी अधिकाराची तरतूद केलेली आहे. भारतीय संविधानाचा भाग तीन न्यायप्रविष्ठ अधिकारानी बनलेला आहे. तर भाग चार मध्ये न्यायप्रविष्ठ नसलेली राज्यांची निती निर्देशक तत्वे दिलेली आहेत. बहुतांश न्यायप्रविष्ठ अधिकार हे नागरी, राजकीय स्वरूपाचे तर मार्गदर्शक तत्वातील अधिकार सामाजिक,आर्थिक स्वरूपाचे आहेत. अशारीतीने मानवाधिकाराच्या वैश्विक जाहीरनाम्यातील बरेच अधिकार भारतीय संविधानात समाविष्ट केलेले दिसून येतात.

**भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार :**

भारतीय संविधानातील भाग तीन मधील कलम 12 ते 35 ही कलमे व्यक्तीच्या मूलभूत अधिकाराशी संबंधित आहेत. भारतीय संविधानाने सर्वसाधारणतः पुढील प्रकारचे सहा मूलभूत अधिकार प्रदान केलेले आहेत.

1) समतेचा अधिकार (कलम 14 ते 18 )
2) स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 19 ते 22 )
3) शोषणाविरुद्धचा अधिकार (कलम 23 ते 24 )
4) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 25 ते 28)
5) सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार (कलम 29 ते 30)
6) घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार (कलम 32)

उपरोक्त नमूद केलेले वरील सर्व अधिकार प्राथमिक नागरी व राजकीय स्वरूपांचे आहेत. भारतीय राज्यघटनेने या अधिकाऱ्यांना न्यायप्रविष्ठ अधिकारांचा दर्जा बहाल केला आहे. म्हणजेच यापैकी एखाद्या अधिकाराचे उल्लंघन झाल्यास त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येते. त्यासाठी भारतीय संविधानाच्या कलम 32 नुसार घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार प्रदान केलेला आहे. अशारीतीने भारतीय संविधानाच्या व्यवस्थेत मानवी अधिकाराची पायमल्ली झाल्यास त्याविषयी यथायोग्य संरक्षणात्मक यंत्रणा पुरविण्यात आलेली आहे.

**भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वे :**

भारतीय संविधानाच्या भाग चार मध्ये राज्याच्या नितीनिर्देशक तत्त्वाची तरतूद करण्यात आलेली आहे. मूलभूत अधिकारप्रमाणे या तत्त्वांना न्यायप्रविष्ठ दर्जा प्रदान करण्यात आलेला नाही. यापैकी एखाद्या अधिकारास प्रत्यक्षात आणायचे झाल्यास त्यासाठी कायदा करण्याचा अधिकार राज्याला देण्यात आलेला आहे. या भागातील अधिकार सामाजिक व आर्थिक स्वरूपाचे अधिकार आहेत. उद. कामाचा हक्क, समान कामासाठी स्त्री पुरुषना समान वेतन,बालकांचे अधिकार,दुर्बल घटकांचे अधिकार, बेरोजगारी वृद्धाप काळात सार्वजनिक साहाय्य प्राप्त करण्याचा अधिकार, कामाच्या ठिकाणी आरोग्यदायी व मानवी वातावरणाचा अधिकार इत्यादी अधिकारांचा यात अंतर्भाव होतो. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांच्या अधिकारांचे स्वरूप पाहिल्यास असे लक्षात येते की हे अधिकार अधिक पायाभूत आहे. तथापि त्यासाठी आवश्यक संसाधनाचा अभाव व भारतीय राज्याच्या मर्यादित क्षमतेचा विचार करून या अधिकारना बंधनकारक करण्यात आलेले नाही. त्यामुळे या भागातील अनेक महत्त्वपूर्ण अधिकार अजूनही प्रत्यक्षात येऊ शकले नाहीत.

**स्वतंत्र न्यायपालिका :**

भारतीय संविधानाने संघराज्य पद्धतीचा अवलंब केल्यामुळे स्वतंत्र न्यायव्यवस्था अटळ बनली आहे. वास्तविक पाहता कोणत्याही आधुनिक लोकशाही समाजात न्याय समाजव्यवहारासाठी स्वातंत्र्य निपक्षपातीपणे व स्वायत्त न्यायपालिक पालिका असणे आवश्यक ठरते.ही बाब लक्षात घेऊनच भारतीय संविधान निर्माण कर्त्यांनी स्वतंत्र न्यायपालिकेची निर्मिती करण्यात आलेली आहे. भारतीय संविधानात पुरवलेल्या अधिकारचे संरक्षण करणे ही भारतीय न्यायव्यवस्थेची प्रमुख जबाबदारी आहे. म्हणूनच एखाद्या मूलभूत अधिकाराचा संकोच अथवा त्याचे उल्लंघन होत असल्यास संबंधित कृती घटना बाह्य ठरविण्याचा म्हणजे न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार न्यायव्यवस्थेला देण्यात आलेला आहे. भारतीय संविधानाच्या कलम 13 उपकलम दोन हे मूलभूत हक्कांच्या संरक्षणार्थच न्यायालयास न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार प्रदान करते. कलम 32 नुसार सर्वोच्च न्यायालय तर कलम 32 व 226 आधारे उच्च न्यायालयामध्ये जाऊन मूलभूत अधिकारच्या पायमल्लीविरुद्ध दाद मागता येते.

भारतीय संविधानाच्या प्रक्रियेचा धावता आढावा घेतल्या असे लक्षात येते की न्यायपालिकेने मूलभूत अधिकाराच्या संरक्षणासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय दिले आहेत.1967 चा गोलकनाथ,1973 चा केशवानंद हे खटले मूलभूत अधिकाऱविषयी खटले म्हणून ओळखले जातात. एवढच नाही तर 1970 च्या दशकापासून व्यक्तींच्या अधिकारांचे व्यापक निर्वचन करून त्यांची व्याप्ती वृद्धिंगत करण्याचे कार्य हे न्यायालयाने पार पाडले आहे. सर्वोच्च न्यायालयाने 1978 च्या अनेक खटल्यात कलम 21 अंतर्गत येणाऱ्या जीवित व स्वातंत्र्याच्या अधिकाराचा व्यापक अर्थ स्पष्ट करून त्यात प्राथमिक शिक्षण, आरोग्य, निवारा गोपनीयता,समान कामात समान वेतन या अधिकारांचा ही समावेश केला आहे. हे करताना सुरुवातीच्या काळात अधिकाऱच्या संविधानातील विधिवत आयामावर भर देणाऱ्या न्याय मंडळी 1980 नंतर जनहितार्थ याचिकांच्या माध्यमातून अधिकारांची सामाजिक आर्थिक बाजू देखील लक्षात घेण्यात सुरुवात केली होती. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश पीएन भागवती कृष्णा अय्यर यांनी जनहित याचिकनद्वारे अधिकाऱचा अधिक उदार व व्यापक करता लावण्यावर भर दिला होता. एवढेच नव्हे तर संसदीय लोकशाही प्रक्रियेत ज्या बाबी पार पाडणे हे प्राथमिक कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाचे जबाबदारी असते त्या संदर्भात न्यायालय आदेश देऊ लागले.tयातूनच न्यायालयीन प्रक्रियेचा उगम झाला. अशारीतीने न्यायालयाने व्यक्तीच्या केवळ नागरी, राजकीय अधिकारांचीच नव्हे तर सामाजिक व आर्थिक अधिकाऱचा दखल घेण्याचा प्रयत्न केला.

**राष्ट्रीय मानवी अधिकार आयोग :**

राष्ट्रीय मानवी अधिकार आयोग ही संसदीय कायदाद्वारे निर्माण झालेली संस्था असून मानवी अधिकारांच्या संवर्धनात मध्यवर्ती भूमिका बजावत असते. मानवी अधिकार संरक्षण कायदा 1993 द्वारा हा आयोग स्थापन करण्यात आला आहे. नागरिकांच्या जीवित, स्वतंत्र,समता आणि प्रतिज्ञापूर्वक जीवन जगण्याच्या मानवी अधिकारांचे योग्य रीतीने संरक्षण केले जाते की नाही यावर हा आयोग करडी नजर ठेवतो.

**मानवी हक्क आयोगाची उद्दिष्ट :**

- ज्या आधारे मानवी अधिकार विषयक मुद्द्यांची दखल घेता येईल अशा घटनात्मक यंत्रणेला बळकटी देणे.
- मानवी अधिकाराच्या उल्लंघनाविषयीच्या तक्रारीची भयमुक्त वातावरणात दखल घेणे.
- मानवी अधिकाऱना बडकटी देण्यासाठी आजपर्यंत हाती घेतलेल्या घेण्यात आलेल्या साधनास समर्थन देणे.

**राष्ट्रीय मानवी अधिकार आयोगाची रचना** :

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगामध्ये एक अध्यक्ष व इतर चार सदस्य अशी आयोगाची सदस्यांच्या आहेत. आयोगाचा अध्यक्ष हा सर्वोच्च न्यायालयाचा माजी न्यायाधीश असला पाहिजे. उर्वरित चार

सदस्यांपैकी प्रत्येकी एक सदस्य सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचा वर्तमान अथवा माजी न्यायाधीश असेल उर्वरित दोन सदस्यांना मानवी हक्क संवर्धनाच्या कार्याचा अनुभव असावा अथवा मानवी अधिकाराच्या क्षेत्राविषयी विशेष जाण असावी. त्याचप्रमाणे विशिष्ट कार्याच्या संदर्भात राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग, अनुसूचित जाती जमाती आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्ष हे राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे पदसिद्ध सदस्य मानले जातात.

**समारोप :**

मानवाधिकार हे प्रत्येक मानवाला केवळ मानव म्हणून जन्मतः मिळालेले अधिकार आहेत. त्यात जीवन जगण्याचा अधिकार, स्वातंत्र्य, समानता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, आणि प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार यांचा समावेश होतो. हे अधिकार जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेने घोषित केले असले तरी, भारतात याचे मजबूत रक्षण भारतीय संविधानाद्वारे केले जाते. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे आणि सर्वसमावेशक संविधान असून, त्यात मूलभूत अधिकारांच्या माध्यमातून मानवाधिकारांचे संरक्षण केले आहे. कलम 14 ते 32 पर्यंत दिलेले हक्क जसे की समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शिक्षण व संरक्षणाचा अधिकार इत्यादी नागरिकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करतात. सर्वोच्च न्यायालय हे या हक्कांचे अंतिमरक्षक असून, जनहित याचिकेद्वारे देखील नागरिक आपले हक्क मागू शकतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे अधिकार सुरक्षित ठेवणे म्हणजेच लोकशाहीचे खरे मूल्य जपणे होय. त्यामुळे भारतीय संविधान केवळ कायद्याचा दस्तऐवज नसून, मानवी प्रतिष्ठा, न्याय व समानतेचे प्रतीक आहे. मानवाधिकार आणि संविधान यांचे नाते अतूट आहे, आणि ते एकत्रितपणे देशाच्या सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांची जपणूक करतात.

**संदर्भ ग्रंथसूची :**

- प्रा. पाटील व्ही. बी, "मानवी हक्क " के सागर पब्लिकेशन,पुणे,2009.
- प्रा. कुलकर्णी पि.के," मानवी हक्क आणि सामाजिक न्याय" डायमंड प्रकाशन, पुणे, 2013.
- भोळे भा.ल, " भारतीय शासन आणि राजकारण" पिंपळापुरे प्रकाशन.
- सबनीस नी. " मानवी हक्क संरक्षण अधिनियम 1993" मुकुंद प्रकाशन, ठाणे, 2005.
- डॉ.पेशवे व्ही. एम., पेशवे मंदाकिनी,"मानवाधिकार अर्थ व व्याप्ती", यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम आवृत्ती 2010.